बुधवार दि.२४ एप्रिल २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २४२
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत  संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com

# परळीत दिव्यांग बांधवांनी दिले पंकजा ताई मुंडेंना 'विजयी भव' आशीर्वाद

## पंकजाताई मुंडेंच्या भाषणाने दिव्यांगही गहिवरले !


लोकनेता न्यूज नेटवर्क

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

दिव्यांगांच्या जीवनात आनंद यावा यासाठी मी हात नसलेल्यांचे हात, दृष्टी नसलेल्यांची दृष्टी आणि शब्द नसलेल्यांचे शब्द होईल. तुमच्यात मला देव दिसतो. तुमच्यासाठी काही तरी करू शकेल एवढी शक्ती मला मिळावी. जीवात जीव असेपर्यंत तुमच्या सेवेसाठी कशाचाही विचार करणार नाही, तुमच्या आशीर्वादाने संसदेत तुमचा आवाज बनुन काम करेल अशा शब्दांत भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी आज दिव्यांग बांधवांची मने जिंकली. पंकजाताईंच्या भाषणाने गहिवरून गेलेल्या दिव्यांग बांधवांनी त्यांना मनापासून 'विजयी भव' चे आशीर्वाद दिले. दरम्यान पंकजाताई हे आश्वासक आणि विश्वासक नेतृत्व असून मंत्री असताना त्यांनी दिव्यांगांसाठी निधी वाढवून दिला, आता त्यांचेसाठी काहीतरी करण्याची वेळ आली आहे, त्यांना मोठया मताधिक्याने संसदेत पाठवा असं आवाहन दिव्यांग कल्याण मंत्रालय अभियानाचे उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे यांनी यावेळी केले.

पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ डॉ संतोष मुंडे यांच्या पुढाकाराने मोंढा विभागात दिव्यांग, विधवा, परितक्त्या, ज्येष्ठ नागरिक, माजी सैनिकांच्या संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी त्या बोलत होत्या. भाजपचे शहराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी,





जि.प. गटनेते अजय मुंडे, नगरसेविका उमाताई समशेट्टे, शुभांगी गिते आदी याप्रसंगी उपस्थित होते. दिव्यांग बांधवांच्या उपस्थितीने खचाखच भरलेल्या या संवाद बैठकीस मार्गदर्शन करताना पंकजाताई म्हणाल्या, तुमची एवढी मोठी संख्या मला अंतर्मुख करणारी आहे. कलियुगात आज कुणीही समाधानी नाही, तुमच्याकडे पाहून मला तुमच्यात देव दिसतो, किती हा उत्साह..असेच आशीर्वाद मला द्या. राजकारणात आज जातीवरून एकमेकांच्या अंगावर धावून जाणाऱ्या जगात तुमच्याकडून काहीतरी शिकले पाहिजे. ज्ञान आणि पैसा देण्याएवढी मी मोठी नाही पण तुम्हा सर्वांना विश्वास मात्र नक्की देईन.दिव्यांगांची सेवा ही सामाजिक कार्य करणाऱ्यांसाठी संधी आहे. समाजातील दुर्लक्षीत घटकांसाठी कार्य करण्याची शिकवण मला लोकनेते मुंडे साहेबांकडुन मिळाली आहे. खा.प्रितमताई यांनी खूप छान काम केलं. गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने दिव्यांगासाठी शिबीर घेवुन अनेक उपक्रम राबवत कृत्रिम अवयव, सायकल, कर्णबधीरांना कानाच्या मशिन असे साहित्य वाटप केले. तुमची साथ मिळाल्यास संसदेत तुमचा आवाज बनून काम करेल. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांना भेटून दिव्यांगाच्या समस्या त्यांच्या कानावर घालत प्रभावी योजना सुरु करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

राज्यात मी मंत्री असताना महिला बचतगटांना प्रोत्साहन देत शुन्य टक्के दराने कर्ज,महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ उपलब्ध करुन दिली.दिव्यांगासाठी नगरपालिका व ग्रामपंचायत अशा स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये मध्ये ५% स्वनिधी राखीव ठेवण्याचा निर्णय,दिव्यांगांच्या मानधनात वाढ असे निर्णय घेतले. महिला व दिव्यांग व्यक्तीसाठी अनेक उपक्रम राबविले असल्याचे पंकजाताईंनी सांगितले. दिव्यांग बांधवांची संख्या मोठी असुन त्यांना आपल्या हक्काच्या जागेत बसुन काम करता यावे यासाठी परळी शहरात लवकरच दिव्यांग व जेष्ठ नागरीकांसाठी भवन उभारणार असल्याचे पंकजाताई म्हणाल्या.दिव्यांगांशी संवाद साधतांना स्वतः पंकजाताई गहिवरून गेल्या. अतिशय मनमोकळा संवाद साधत त्यांनी त्यांची मने जिंकली. प्रचंड उकाडा होत असतानाही पंकजाताईंचे मार्गदर्शन ऐकताना असंख्य दिव्यांग व्यक्ती विशेषतः महिला भावनिक झाल्या होत्या. ताई, तुम्ही या निवडणुकीतील केवळ उमेदवारच नव्हे तर खासदार आहात. देशातुन सर्वाधिक मतांनी निवडुन येण्यासाठी आम्ही आणि आमचे आशीर्वाद सर्व तुमच्यासोबत आहोत, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

# पहिली वर्गामध्ये प्रवेश पात्र बालकांची मिरवणुक

## मजरे धर्मापुरी येथील जि.प.प्रा. शाळेत शाळापुर्व तयारीचा मेळावा



लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार तालुक्यातील मजरे धर्मापुरी येथील जि.प. प्रा. शाळेत शाळापुर्व तयारीचा मेळावा घेण्यात आला.या शाळापुर्व तयारी मेळाव्याला शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मोहन पंढरे व सरपंच प्रतिनीधी कैलास इंगळे,व मु.अ. काशीनाथ पांचाळ यांच्या हस्ते प्रथमत:ज्ञानशारदा सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करुन पहीली मध्ये प्रवेशपात्र बालकांना पुष्पहार घालुन त्यांचे स्वागत मान्यवरांच्या करकमलांनी करण्यात आले व त्या बालकांची गावातुन वाजत गाजत ढोल-ताशाच्यां गजरात मिवणुक काढण्यात आली यावेळी शाळेचे मु.अ.काशीनाथ पांचाळ यांनी गावांतील पालकांना आपले पाल्य पहिली वर्गचा प्रवेशा पासून वंचित न राहता,सर्व सहा वर्षाचा पाल्य पहिलीत प्रवेश घेण्यासाठी शाळेकडे प्रवेश घ्यावा.असे गावांतील पालकाना विनंती केली,यावेळी गावातील पालक महिला पुरुष या मिरवणुकीत सामिल झाले होते

# अहिंसा पर्मो धर्म जियो और जिनेदोच्या जयकारत भोकरदन शहरात भगवान महावीर जन्मोत्सव उत्साहात साजरा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । शेख जफर**

भगवान महावीर यांची जयंती रविवारी भोकरदन शहरात उत्साहात साजरी करण्यात आली.सकाळी ९ वाजता जैन मंदिर येथे ध्वजारोहणाचा मान कैलास सेठ,महावीर,राजेन्द्र ,महेंद्र बाकलीवाल व भगवान महावीर चौक चे ध्वजारोहण चा मान संतोष,सूरज अन्नदाते यांना मिळाला ,नंतर भगवान महावीर यांच्या प्रतिमेची ढोल-ताशांच्या गजरात
मिरवणूक काढण्यात आली,भगवान महावीर चौक चे अनावरण करुण ध्वजारोहन करण्यात आले,कुंभकालश चा मान श्री नेमीचंद अनिलकुमार लोहाडे यांना मिळाले व पाळना हलविन्याचा मान प्रदीप,लता,आकाश अंकिता,मितांश पांडे यांना मिळाला ,ही मिरवणूक शहरातील जैन मंदिर,भगवान महावीर चौक,महात्मा फुले चौक, रोकडा हनुमान मंदिर, सराफा मार्केट, हेडगेवार चौक, आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, यामार्गे परत ,भगवान महावीर चौक ते जैन मंदिर येथे आली.



याप्रसंगी आ. संतोष दानवे, आशा पांडे, , काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष,
राहुल देशमुख, इंदजीत देशमुख,सतीश रोकडे, शोभा मतकर, मुकेश चिने, मोहन हिवरकर, अनिल देशपांडे, महादू डोभाळ,दिपक मोरे,केशव जंजाळ, सुरेश तळेकर,योगेश शर्मा,फहीम कादरी,कदीर बापू रमेश जाधव व इतरांनी भगवान महावीर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. आमदार संतोष दानवे यांच्या सूचनेने अय्यूब बेग यांनी भगवान महावीर जन्मोत्सव असल्याने दवाद रदद् करुण शिर्खुमा पार्टी ठेवत दाखविला सामाजिक एकोपा आणि दिला अहिंसाचा संदेश त्यासाठी भगवान महावीर समितीचे अध्यक्ष मयुर बाकलीवाल व जितेंद्र बाकलीवाल यांनी सकल जैन समाजातर्फे त्यांचा सत्कार केला या मिरवणुकीत इंद्रा इंद्राणीचा मान व महाप्रसाद रोहित बाकलीवाल व भाग्यश्री बाकलीवाल यांना मिळाला. यानंतर श्री १००८ शांतिनाथ जैन मंदिर येथे अभिषेक करण्यात आला. तसेच शहरात रक्तदान शिबीर घेण्यात आले ५० रक्तदात्यांनी रक्तदान केले व विविध कार्यक्रमही घेण्यात आले. या वेळी भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव चे अध्यक्ष मयुर बाकलीवाल,पत्रकार अमित लोहाडे, संकेत जैन,सूरज अन्नदाते,संजोश बाकलीवाल,स्वप्निल जैन,अमित खुळे,मयुर अंबेकर,पियूष गंगवाल,वृषभ काला, श्रेणीक पारख,राकेश पानसरिया,जीतू भंसाली,भरत पांडे, उ-सुमीत लोहाडे आदींनी परिश्रम घेतले या मिरवणूकीत महिला व पुरूष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमरावतीत सभेच्या मैदानांवरून बच्चू कडू आक्रमक

अमरावती-अमरावती लोकसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार नवनीत राणा यांच्या विरोधात प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने उमेदवार देण्यात आला आहे. या उमेदवाराच्या प्रचारासाठी आमदार बच्चू कडू यांच्या पक्षाच्या वतीने अमरावती मधील सभेचे मैदान बुक करण्यात आले होते. मात्र, त्यांची परवानगी रद्द करून त्या ठिकाणी अमित शहा यांच्या सभेला परवानगी देण्यात आल्यामुळे आमदार बच्चू कडू आक्रमक झाले आहेत.

## चारोळी

**फुकाची बडबड टाळती जन**
**नसते रमत कुठेही कुणाचे मन**
**जाणूनी घ्यावीत संघर्षमय रण**
**रोमांचित व्हावे विचाराने तन.**

रंजना सानप
मायणी (सातारा)


# धर्माबाद येथील विस्डम स्कूलचे प्राचार्य औसाजी जाधव यांना विद्यारत्न पुरस्कार प्रदान

लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**

नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागात शैक्षणिक क्षेत्रात सर्वोत्तम पायाभूत सुविधा देणारे, प्रसिद्धी पासून दूर राहत विद्यार्थ्यांचा विकास हाच माझा ध्यास हे ब्रीदवाक्य उराशी बाळगणारे येथील विस्डम स्कूलचे कृतिशील प्राचार्य औसाजी जाधव यांना ए.ई.एम.एस. चा मानाचा असा विद्यारत्न पुरस्कार मिळाला असून नांदेड येथे झालेल्या एका शानदार कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते तो पुरस्कार त्यांना वितरित करण्यात आला.

असोसिएशन ऑफ इंग्लिश मीडियम स्कूल तर्फे इंग्लिश मीडियम शाळेच्या निकष पूर्ण प्रगतीपथात सहभागी असलेल्या शाळांना व प्राचार्यांना हा राज्यस्तरीय मानाचा सन्मान देण्यात येतो. त्यासाठी पुरस्कार प्राप्त संस्थांना व व्यक्तींना त्यांच्या कार्याची कसून परीक्षा द्यावी लागते. एक तटस्थ कमिटी




त्यांच्या एकंदरीत कार्याचे निकष पूर्ण मूल्यमापन करीत असते.

धर्माबाद येथील विस्डम स्कूलचे प्राचार्या औसाजी जाधव हे सुरुवातीपासूनच हाडांचे शिक्षक आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ते अहोरात्र कष्ट घेत असतात. त्यासाठी शाळेचा प्राथमिक विकास, शाळेचा निकाल, शाळेची पायाभूत सुविधा, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व त्या अनुषंगाने ती शाळा तालुक्यात स्तरावर सर्वोत्तम शाळा ठरते का? या सर्व परीक्षेत नांदेड जिल्ह्यातून ग्रामीण भागात सर्वोत्तम पायाभूत सुविधा देणारे विस्डम स्कूल हे पात्र ठरले असून त्या निकषावर जाधव सरांना उपरोक्त पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी असोसिएशन ऑफ इंग्लिश मीडियम स्कूल चे अध्यक्ष केशव सर यांच्यासह असोसिएशनचे सर्व कृतीशील सदस्य नांदेड येथील कार्यक्रमात उपस्थित होते. त्या पुरस्कारासोबतच २५ वर्षापेक्षा जास्त शैक्षणिक क्षेत्रात योगदान देणारे शिक्षारत्न पुरस्कारही उपरोक्त संस्थेने प्रदान केले असून नांदेडच्या नागार्जुन इंग्रजी शाळेच्या शैला पवार, ऑक्सफर्ड शाळेच्या अनुराधा, ब्ल्यू बेल्स च्या लक्ष्मी आणि खलसे आदींना शिक्षारत्न पुरस्कार प्रदान करण्यात आले.उपरोक्त पुरस्कार मिळाल्यावर विस्डम शाळेवर व प्राचार्य औसाजी जाधव यांच्यावर कौतुकाचा पाऊस पडत आहे.

# लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अहमदनगर-बीड सिमेवर नाकाबंदी

## अंभोरा, दौलावडगांव चेकपोस्ट वरती पोलिसांचा कडक पहारा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

बीड जिल्हा लोकसभेची निवडणूक १३ मे रोजी मतदान होत असून या निवडणुका निर्भयपणे आणि निरपेक्ष वातावरणात व्हाव्यात, म्हणून आदर्श आचारसंहिताही लागू, करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर अहमदनगर व बीड जिल्हा सिमेवर पोलिसांकडून नाकाबंदी करून कडक पहारा देण्यात आला आहे. या परिसरात कुणीही अवैध दारू बाळगू नये, अथवा विक्री करू नये व इतर जिल्ह्यातून दारू, पैसा जिल्ह्यात येऊ नये यासाठी अंभोरा व दौलावडगांव येथे जिल्हा सीमेवर प्रत्येक जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांची कसून तपासणी करण्यात येत आहे.

अंभोरा पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक मंगेश साळवे यांनी नाकाबंदीची पाहणी करून अतिशय कसून काटेकोरपणे वाहनांची तपासणी करण्याच्या सुचना दिल्या आहेत. बीड जिल्ह्यात प्रत्येक पर जिल्ह्यांतून येणाऱ्या सिमा सरहद्दीवर प्रत्येक मार्गावर पोलिसांनी आता चेकपोस्ट उभारले आहेत. सीमेवर प्रत्येक जाणाऱ्या वेणाऱ्या वाहनांची कसून तपासणी करण्यात येत आहे. लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर काल पासून वाहनांची कसुन तपासणी करण्यात येत आहे.अवैध दारु व पैसा जिल्ह्यात येणार नाही यासाठी अंभोरा पोलीस ३ कर्मचारी व निवडणूक विभाग ४ कर्मचारी



यामध्ये २ महसूल कर्मचारी हे २४ तास येणा-या जाणा-या गाड्यांची नोंद ठेवून कडक तपासणी करत आहेत. जिल्हाबाहेरील दारु व पैसा जिल्ह्यात येणार नाही यासाठी अंभोरा पोलीस लक्ष ठेवून आहेत,लोकसभेची निवडणूक चांगल्या वातावरणात पार पडावी आणि निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर इतर जिल्ह्यातून ठिकाणाहून अवैध दारू किंवा पैसा बीड जिल्ह्यात येऊ नये म्हणून अहमदनगर बीड जिल्हा सिमेवर अंभोरा व दौलावडगाव येथे पोलिसांनी चेकपोस्ट उभारलेले आहेत. अहमदनगर जिल्ह्यातून बीड मध्ये येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येक वाहनांची या चेकपोस्टवर नोंद घेऊन कडक तपासणी करण्यात येत आहे.

# मा.मंत्री हर्षवर्धन पाटील यांचा प्रचाराचा झंझावात सुनेत्रा पवार यांचेसाठी रविवारी घेतल्या ५ सभा

लोकनेता न्यूज नेटवर्क

इंदापूर । बबनराव धायतोंडे

भाजप नेते व राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष, माजी मंत्री यांचा हर्षवर्धन पाटील यांचा बारामती लोकसभा मतदारसंघाच्या महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांचेसाठी प्रचाराचा झंझावात सुरु आहे. हर्षवर्धन पाटील यांनी इंदापूर तालुक्यात रविवारी (दि.२१) वडापुरी, शिरसोडी, बिजवडी, पळसदेव, भिगवण येथे सभा घेऊन अबकी बार ४०० पार साठी सुनेत्रा पवार यांना विजयी करण्याचे आवाहन केले. दरम्यान,आज सोमवारी (दि.२२) हर्षवर्धन पाटील यांच्या शेटफळगढे (सकाळी ८.३० वा.), लाकडी (मारुती मंदिर - दुपारी ११:३०), सणसर ( ४:३० वा.), लासुर्णे ( सायंकाळी ६:३० वा.) , शेळगाव ( रात्री ७:३० वा.) या प्रमाणे प्रचाराच्या सभा होणार आहेत.

हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते श्री क्षेत्र नीरा नरसिंहपूर येथे सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासाठी भाजपच्या वतीने सभांचा शुभारंभ शनिवारी (दि.२०) करण्यात आला. शनिवारी हर्षवर्धन पाटील यांच्या सहा ठिकाणी मोठ्या सभा झाल्या.

तर रविवारी (दि.२१) हर्षवर्धन पाटील यांच्या सभांना पुणे जिल्हा भाजप युवा मोर्चाच्या अध्यक्षा अंकिता पाटील ठाकरे, तालुकाध्यक्ष अँड.शरद जामदार, भाजपचे गावोगावचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.





रविवारी झालेल्या वडापुरी, शिरसोडी, बिजवडी, पळसदेव, भिगवण येथील सभांमध्ये बोलताना हर्षवर्धन पाटील म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदींचे नेतृत्व हे विश्वव्यापी असे नेतृत्व आहे. अशा या नेतृत्वाचा देशातील प्रत्येक नागरिकाला अभिमान आहे. शेतकरी, कामगार, मागासवर्गीय, युवक, महिला आदि सर्वांसाठी केंद्र सरकारने विविध योजना यशस्वी राबविल्या आहेत. सर्वांना मोफत धान्य ही योजना तर ऐतिहासिक अशी आहे. आगामी काळातही समाजातील सर्व घटकांच्या विकासाची गॅरंटी भाजप नेतृत्वाखालील एनडीए ने घेतली आहे.


पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान होणार आहेत. देशातील मतदारांबरोबर इंदापूर तालुक्यातील मतदारही मोदींबरोबर आहे. केंद्र व राज्य पातळीवरील भाजप नेतृत्वाचे बारामती मतदारसंघावर लक्ष आहे. त्यामुळे भाजप कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे, निष्ठेने व जबाबदारीने काम करून उमेदवार सुनेत्रा पवार यांना मोठे मताधिक्य मिळवून द्यावे, असे आवाहन केले. भाजप कार्यकर्त्यांनी आपले बुथवरील मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी नियोजन करावे. इंदापूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ७ गटांमध्ये तसेच इंदापूर शहरामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार व आपल्या संयुक्त प्रचारसभा होणार असल्याची माहितीही भाजप नेते हर्षवर्धन पाटील यांनी दिली. हर्षवर्धन पाटील यांनी प्रचार सभांचा झंजावात सुरू केल्याने भाजप कार्यकर्त्यांमध्ये महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांचा प्रचार करणे संदर्भात असलेला संभ्रम दूर झाल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.

### विकासाचे नवीन पर्व सुरु होणार –हर्षवर्धन पाटील

भाजप नेते हर्षवर्धन पाटील यांनी रविवारी दि. २१ विविध सभांमध्ये बोलताना सांगितले की, केंद्र व राज्य सरकारच्या मदतीने इंदापूर तालुक्यामध्ये विकासाचे नवीन पर्व सुरु करायचे आहे. केंद्र सरकारच्या विविध कल्याणकारी योजना तसेच तालुक्यातील शेतीचा पाणी प्रश्न मार्गी लावणेसाठी केंद्राचा निधी मिळवायचा आहे. केंद्र व राज्यातील भाजपचे नेतृत्व इंदापूर तालुक्याच्या पाठीशी आहे. त्यासाठी महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांना भरघोस मतदान करावे, असे आवाहन भाजप नेते हर्षवर्धन पाटील यांनी केले

## सावखेड तेजन येथे जगदंबा यात्रा उत्सव संपन्न





लोकनेता न्यूज नेटवर्क

सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत

तालुक्यातील सावखेड तेजन येथे गेल्या अनेक वर्षांपासून पिढ्यान् पिढ्या चैत्रा मध्ये जगदंबेचा यात्रा उत्सव साजरा केला जातो. मराठी वर्षा प्रमाणे चैत्र हा पहिला महिना या महिन्यात खेड्या गावांमध्ये परंपरे नुसार वेगवेगळ्या पद्धतीने चैत्रा मध्ये चैतीचा उत्सव साजरा केला जातो.

सावखेड तेजन येथे गुढीपाडवा झाल्या नंतर १५ दिवसांनी चैती साजरी केली जाते. या दिवशी दिवस भर गावामध्ये यात्रा भरते. दुपारी पूवर्जांची अस्मिता असलेला बुधवतांचा वाडा येथून देवीच्या मंदिरा पर्यंत झेंडा काढला जातो. त्या नंतर मंदिरा जवळ बारा गाड्यांचा कार्यक्रम पार पडून देवीची आरती होते. रात्रीच्या वेळेला गावामध्ये जागरण गोंधळाचा कार्यक्रम दरवर्षी वेगळ्या प्रकारे ठेवण्यात येतो. या कार्यक्रमातून गावकर्यांचे मनोरंजन करण्याचे काम केल्या जाते.

दुसऱ्या दिवशी सकाळी ६. वाजेच्या सुमारास आईचे सोंग निघते. यामध्ये एक विशेष म्हणजे आईचे सोंग हे वेगळ्या पद्धतीने सजवले गेलेले असते. सहावाज्या पासून नऊ वाजे पर्यंत हा कार्यक्रम चालतो. गावातील तसेच गावाबाहेरील लोक या दोन दिवसासाठी गावामध्ये हजर राहून चैत्राच्या यात्रेचा आनंद घेतात.

## भाजप युवा मोर्चाच्या शहर अध्यक्ष पदी अ‍ॅड.मयुर शिंदे यांची नियुक्ती

लोकनेता न्यूज नेटवर्क

इंदापूर । बबनराव धायतोंडे

इंदापूर शहर भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या शहर अध्यक्षपदी ड.मयुर रघुनाथ शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली या निवडीचे पत्र राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष ,माजी मंत्री हर्षवर्धन पाटील व भाजपा युवा मोर्चा पुणे जिल्हा अध्यक्षा अंकिता पाटील ठाकरे यांच्या हस्ते मयुर शिंदे यांना आज दि २२-४-२०२४ रोजी देण्यात आले.



भाजप नेते हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते ड.मयुर शिंदे यांचा सत्कार करण्यात आला

इंदापूर शहरामध्ये भाजपा नेते हर्षवर्धन पाटील व युवा नेत्या अंकिता पाटील ठाकरे,भाजप युवा मोर्चा कोअर कमिटीचे प्रमुख राजवर्धन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्न केला जाईल तसेच पक्षाचा जनाधार वाढविण्याचे काम करू अशी ग्वाही नूतन शहराध्यक्ष ड.मयुर शिंदे यांनी दिली.दरम्यान इंदापूर शहर युवा मोर्चा शहराध्यक्षपदी मयुर शिंदे यांच्या नियुक्तीचे स्वागत केले जात आहे.

## महत्वाचे

### कृषी प्रधान देशात आज सुद्धा शेतकरीच त्रस्त असेल तर या देशाला कृषी प्रधान म्हणायचं तरी कोणत्या आधाराने?

लोकांनी लोकांचे लोकांसाठी चालविलेले राज्य ही आपल्या लोकशाहीची व्याख्या.इथे बँक सर्व्हिस देतात तर त्या सुद्धा जीएसटी लावणं सोडत नाही. मग शेतकऱ्यांच्या मालावर पण व्यापाऱ्यांनी जीएसटी द्यायला हवा या मताचा मी आहे. हो चुकीचं वाटत असेल तर वाटू द्या पण आज मला कृषी प्रधान देशात राहत असल्याची लाज वाटते...या वर आपले मत नोंदवा योग्य प्रतिसाद देणाऱ्याला दैनिक लोकनेता मधून मत व्यक्त करण्याची संधी दिल्या जाईल.

**ज्ञानेश्वर बुधवत**
९९६०२०९१४९

**प्रतिक्रिया**

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे, असे आपण मानतो तसेच शेतकऱ्याला जगाचा पोशिंदा, बळीराजा अशी अनेक विशेषणेही लावतो परंतु वस्तूत: आजमितीला शेतकऱ्यावर खूप वाईट दिवस आलेले आहेत. त्यात भरीस भर म्हणजे आकारला जाणारा जीएसटी. यामुळे सर्वसामान्य माणूस भरडून निघत आहे. आमचा शेतकरी मिळेल त्या बाजारभावात आपले उत्पादन विकतो व समाधान मानतो. अशा परिस्थितीत अडते- व्यापाऱ्यांनी शेतकऱ्याला मालाच्या मोबदल्यासोबतच जीएसटी सुद्धा द्यावा. जेणे करून थोड्या बहु प्रमाणात शेतकऱ्याची परिस्थिती सुधारेल.

**प्रा. मधुकर जाधव,**
**देऊळगाव राजा**

## आष्टी तालुक्यातील डोंगरपाट्यात संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटलांचे अभूतपूर्व स्वागत

### धामणगाव येथे जेसीबीने फुलांची उधळण करून जल्लोषात भव्य दिव्य असं स्वागत

लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांचे दौलावडगाव पासून हार तूर्यांसह ग्रामीण वाद्य व फटाकड्यांची आतिषबाजी.ठिक ठिकाणी शेकडो ग्रामस्थांन,महिलांनी स्वागत केले.धामणगाव येथे जेसीबीच्या सहाय्याने पाच क्विंटल फुलांची उधळण करून जल्लोषात भव्य दिव्य असं स्वागत केले यावेळी हजारो सकल मराठा समाज व मुस्लिम समाज बांधवांच्या उपस्थितीमध्ये जोरदार स्वागत.मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे आष्टी तालुक्यातील धनगरवाडी (डोईठाण) येथील सप्ताहाच्या कार्यक्रमाला जात असताना दौलावडगाव,आंबेवाडी कारखेल म्हसोबावाडी,घाटा पिंपरी, धामणगाव, डोईठाण, सांगवी पाटण, कोहिनी कापसी अशा ठिक





ठिकाणी फुल हार, फटाक्यांची आतिषबाजी व ढोल ताशे बडवत मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले.

यावेळी सकल मराठा समाज व मुस्लिम समाजातील अनेक तरूण त्यांचे स्वागतासाठी उपस्थित होते.यावेळी 'मनोज जरांगे पाटील तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है', 'एक मराठा लाख मराठा' आदी घोषणां देण्यात आल्या.अहमदनगर बीडच्या सीमेवरील दौलावडगाव येथून डोईठाण पर्यंत जात असताना रस्त्याच्या दुतर्फा सकल मराठा समाजाच्या तरुण बांधवांसह महिला भगिनी ठिकठिकाणी उपस्थित होत्या.यानंतर धनगरवाडी येथे सुरू असलेला ह भ प काशिनाथ महाराज गणेश गड संस्थान नागतळा यांनी प्रारंभित केलेला नारळी सप्ताह मध्ये मनोज जरांगे पाटील यांनी भेट दिली यावेळी ह.भ.प बबन महाराज बहिरवाळ.ह.भ.प काशिनाथ महाराज गणेश गड हे देखील उपस्थित होते.

## सांगवी पाटण येथे दोन दिवसीय भैरवनाथ यात्रेला सुरुवात

### गावकऱ्यांनी स्वखर्चाने बांधले भैरवनाथाचे भव्य दिव्य मंदिर

लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथील जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाणारे भैरवनाथ मंदिर असून येथील यात्रेमध्ये २२ एप्रिल रोजी श्रीक्षेत्र पैठण,नागतळा येथून आलेल्या कावडीची मिरवणूक काढण्यात आली. २३ एप्रिल रोजी सकाळी वाजत गाजत शेरणी,दंडवत,लोटांगण घेऊन भाविक भक्त नवस पूर्ण करतात,तीन ते सहा यावेळेस मुख्य आकर्षण, मंदिरावर,लाइटिंग सजावट डेकोरेशन बँजो, डिजे, डोल,ताशा,लेझिम पथक, देखावा, युवकांचा डान्स,भव्य दिव्य काठी मिरवणूक कार्यक्रम संपन्न होणार आहे,रात्री सहा ते आठ यावेळेस वाटण्याची जुनी परंपरा अजूनही जुनी प्रथा कायम आहे.नंतर रात्री छबिना काढून गावात रातभर मिरवणूक काढण्यात येणार आहे,पहाटे शोभेची दारूची आतिश बाजी करण्यात येते, यावेळी यात्रे मध्ये खेळणी दुकाने, खाऊची दुकाने, महाप्रसादाची दुकाने असे अनेक प्रकारचे दुकाने थाटली जाते,यात्रेमध्ये भावी नवरदेव यांनी दर्शनासाठी जास्त गर्दी करतात,नंतर कुस्त्याचा हंगामा संपन्न होणार आहे , पंचक्रोशीतील पाटण, कोहिनी,खीळद, लिंबोडी, बावी,डोईठाण,सुरुडी, धामणगाव, कारखेल, लमाणतांडा, पुणे, मुंबई, शअहमदनगर,तसेच महाराष्ट्रातून भाविक भक्त भैरवनाथांचे दर्शन घेण्यासाठी येत असतात,त्यांनी दर्शनाचा लाभ घ्यावा असे आव्हान सरपंच दत्तात्रय खोटे आणि समस्त ग्रामस्थ सांगवी पाटण यांनी केले.



# गल्ली गल्ली मुलीने केले बालवाचनालय सुरू या उपक्रमा मूले सर्वत्र तिचे कौवतुक

## पैसा वाचवा, पुस्तक वाचा' असे म्हणत ग्रंथालयाचे साकडे घालणारी ही १४ वर्षीय मुलगी आहे–मरियम मिर्झा







■ लोकनेता न्यूज नेटवर्क

भोकरदन । शेख जफर

गल्ली-मोहल्ल्यातील मुलांसाठी स्वतः च्या पुस्तकांपासून औरंगबाद शहरातील बायजीपुरा गल्ली येथे भारतरत्न डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांच्या नावाने एका मुलीने बालवाचनालय सुरू केले. एकीकडे दिवसेंदिवस मुलं वाचनापासून लांब जात असताना मुलांना पुन्हा पुस्तकांच्या जगात नेण्यासाठी 'पैसा वाचवा, पुस्तक वाचा' असे म्हणत ग्रंथालयाचे साकडे घालणारी ही १४ वर्षीय मुलगी आहे मरियम मिर्झा.

मरियम सध्या औरंगबाद च्या इकरा उर्दू गर्ल्स हायस्कूल येथे शिकत आहे. मुलांमध्ये वाचन संस्कृती रुजविण्यासाठी तीने मोहल्ला बालवाचनालय अभियानाची सुरवात केली. तीच्या या आगळ्या-वेगळ्या उपक्रमाची दखल घेण्यात आली. नुकतेच 'अमेरिकन फेडरेशन ऑफ मुस्लिम्स ऑफ इंडियन ओरिजिन (एएफएमआय) यूएसए आणि कॅनडा' यांच्या वतीने 'विशेष सामाजिक पुरस्कारा'ने गौरविण्यात आले. दिल्ली नगर निगम सिवेक सेंटरच्या दीनानाथ सभागृहामध्ये आयोजित ३३ व्या आंतरराष्ट्रीय वार्षिक समारोहात दिल्लीचे माजी राज्यपाल लेफ्टनंट जनरल नजीब जंग यांच्या हस्ते तीला पुरस्कार प्रदान करण्यात आले. तर, नुकतेच 'असोसिएशन ऑफ मुस्लिम प्रोफेशनल्स' या संस्थेच्या वतीने तिला दिल्ली येथेच 'चेंजमेकर ऑफ दी इयर' हा पुरस्कारही मिळाला.

विद्यार्थ्यांना वाचनाची आवड कशी निर्माण करता येईल? यासाठी तिचे सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. पुस्तकांची आवड निर्माण व्हावी यासाठी काही वेळा विद्यार्थ्यांना मोफत गल्ले वाटप केले जातात, ज्यामध्ये मुले पैसे गोळा करतात आणि या पैशातून त्यांच्या आवडीची पुस्तके खरेदी करतात. तर, कधी 'घर घर किताब, हर घर में किताब' या मोहिमेअंतर्गत परिसरात अभ्यासासाठी पुस्तके देखील वाटली जातात.

शहरातील विविध गल्ली मोहल्ला व झोपडपट्टीतील गरीब व कामगारांच्या मुलांसाठी 'रीड ण्ड लीड फाउंडेशन'च्या सहकार्याने व 'फेडरेशन ऑफ ऑल मायनॉरिटी एज्युकेशनल ऑर्गनायझेशन'च्या मार्गदर्शनाने तीने दोन वर्षात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ३६, मध्य प्रदेशातील बऱ्हाणपूर येथे ५, तर परभणी येथे १५ असे एकूण ५६ बालवाचनालये सुरू केली आहेत. मरियमने मशिदीतही बालवाचनालये सुरु केली आहेत. औरंगबाद च्या ३६व्या बालवाचनालयाचे उद्घाटन पडेगाव येथील अतहर मस्जिद येथे करण्यात आले होते.

मरियमचे वडील मिर्झा अब्दुल कय्यूम नदवी यांचे पुस्तकांचे दुकान आहे. त्यामुळे लहानपणापासूनच ती पुस्तकांच्या सहवासात आहे. मरियम इ. ५ वीच्या वर्गात असताना तिने एका ग्रंथालयाला भेट दिली. त्यावेळेस मित्र शेरखान पठाण याला श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी ग्रंथालय सुरु करण्याची कल्पना तिच्या बालमनात आली आणि तिने तिच्या वडिलांकडे हट्ट सुरू केला. तिचे वडील लगेच तयार झाले. त्यावेळेस तिच्याकडे फक्त १५० पुस्तके होती. तिच्या वडिलांनी तिला अजून १५० पुस्तके दिली आणि अशा ३०० पुस्तकापासून सुरू झाले 'बालग्रंथालय'.

ग्रंथालय सुरू करताना तिला अनेक अडचणी आल्या. नवीन पुस्तके खरेदी करायला पैसे नव्हते. ग्रंथालय सुरू करायला जागाही नव्हती. शिवाय, जागा भाड्याने घ्यायची कुवतही नव्हती. मात्र, या सर्व प्रश्नांवर मरियमने मात करत जागा व पुस्तकही मिळवली. तिच्या आवाहनाला प्रतिसाद देत नागरिकांनी तिला जागा आणि पुस्तकही दिली. घरातील रिकाम्या खोल्या, ओटा, इतकंच काय तिच्या प्रामाणिक प्रयत्नांमुळे तिला ग्रंथालयासाठी मशिदीतदेखील जागा मिळाली. आता तिच्या तीस ग्रंथालयात दोन हजार पेक्षाही जास्त पुस्तके आहेत. तिची शाळा सुटली की ती ग्रंथालयाला भेट देते व दिवसभराचा आढावा घेते. बालग्रंथालय चालवायला तिचे वडील तिला मदत करतात.

### ग्रंथालयाचे वैशिष्ट्य

**ग्रंथालयाला कधीही कुलूप लावले जात नाही. मुलं येतात, पुस्तकं घेतात आणि वाचून झाली की प्रामाणिकपणे जागेवर परत आणून ठेवतात. पुस्तकं चोरीला गेली तरी तिला वाईट वाटत नाही कारण ज्ञानाची भूक असणारेच पुस्तकांची चोरी करतात, असं ती म्हणते. हजारो मुलांना या बालग्रंथालयाचा फायदा होत आहे. मुलं म्हणतात, ''इथे आम्हाला शाळेच्या पुस्तकांव्यतिरिक्त महापुरुषांच्या जीवनकथा, विज्ञानाच्या गोष्टी, थोरांच्या गोष्टी, कॉमिक्स वाचायला मिळतात. त्यामुळे वाचायची आवड निर्माण होते व सवयही लागते. आतापर्यंत दोन हजारपेक्षा जास्त मुलांना या ग्रंथालयाचा फायदा झाला आहे.**

**आताची पिढी वाचत नाही हे मरियमच्या वडीलांना मान्य नाही. ते म्हणतात, ''बरेच पालक बाजारात जाऊन मुलांसाठी पुस्तके खरेदी करत नाहीत. पालक म्हणून आपण त्यांच्या हातात कधी पुस्तक देणार नसाल तर मुलं वाचत नाही हा त्यांच्यावर आरोपही लावायला नको. शहरांमध्ये अनेक ग्रंथालये आहेत पण ते फक्त तरुण आणि प्रौढांसाठी. आपल्याकडे बालग्रंथालय ही संकल्पना या आधी साकारण्यात आली नाही. बऱ्याच ग्रंथालयात तर मुलांना प्रवेशही नसतो.'' तिच्या मैत्रिणींनासुद्धा तिचे कौतुक वाटते. त्यांना शाळेतल्या ग्रंथालयांऐवजी मरियमच्या ग्रंथालयातील पुस्तके जास्त आवडतात. तिच्या शालेय मैत्रिणी म्हणतात, ''इथे आम्हाला नावनोंदणी करणे किंवा ओळखपत्र दाखवणे बंधनकारक नाही. पूर्ण शाळेला तिच्यावर गर्व आहे.'' शहरातील या ग्रंथालय चळवळीची माहिती आता अनेकांना होत आहे. अनेक दात्यांनी तिला स्वतः हून मदतही केली आहे. ही चळवळ फक्त औरंगबाद किंवा महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता त्याचा विस्तार देशभर व्हावा, असे मरियमला वाटते.**


**मरियमचे कौतुक करत खासदार इम्तियाज जलील म्हणतात, मरियमचा छोटासा प्रयत्न तिचे मोठे विचार दर्शवितात. गरजेचे नाही की समाजासाठी काहीतरी करायला खूप पैसे हवे. काहीतरी करायची जिद्द असेल तर आपोआप रस्ते खुले होत जातात. मरियमने बाल वयात घेतलेली झेप बघून काही दिवसांपूर्वी थेट जर्मनीहून इलाना आणि डेफनी या दोन रिसर्च स्कॉलर्स तिला भेटायला औरंगबाद ला आले होत. तिची बालवाचनालयाची संकल्पना बघून त्यांनाही आश्चर्य वाटले. इतक्या लहान वयाच्या मुलीच्या मनात अशी कल्पना येणे हे अत्यंत कौतुकास्पद आहे, असेही त्या म्हणाल्या.**

# देवळालीत भैरवनाथ यात्रोत्सव सुरु कुस्त्यांचा भरणार जंगी आखाडा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजू म्हस्के

आष्टी तालुक्यातील देवळाली येथे जागृत देवस्थान भैरवनाथाचा यात्रोत्सव सालाबादप्रमाणे मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे.भैरवनाथ यात्रोत्सवा निमित्ताने पैठण व नागतळा येथुन कावडीने गंगेचे पाणी आणले जाते.चैत्र पोर्णिमेला म्हणजेच हनुमान जयंतीच्या दिवशी भैरवनाथ यात्रोत्सवाला सुरुवात होते.नवसाला पावणारा व जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या देवळाली येथिल भैरवनाथाच्या चरणी लीन होण्यासाठी पंचक्रोशीतील भाविक येतात.ढोल ताशाच्या गजरात कावडीची गावातून मिरवणूक निघते नंतर कावडीने आणलेल्या पाण्याने भैरवनाथाला अभिषेक करण्यात येतो आणि यात्रेला सुरुवात होते यात्रे निमित्ताने घरोघरी आलेले पाहूणे आणि मित्र स्नेह भेटीनी जणू आनंदाची पर्वणी असल्याचा भास होतो. कावडीनेपाणी आणायला गेलेल्या भाविकांना येताना अमरापुर येथिल चौधरी कुटुंब जेवणाची सोय करते.भैरवनाथ मंदिरात गुळाची शेरणी आणि आंबील घुगर्याचा प्रसाद वाटप होतो. बापूमियाँ यांच्या दारातून नवीन कापड गलप संदल घेऊन सर्व गावकरी पिरबाबाला गलप व चादर चढवतात तेथून भैरवनाथ मंदिराकडे येतात मंदिरा समोर ठेवलेल्या देवाच्या छबीना (घोड्याला) नवीन कापड फुलांचा हार आदि साहित्याने सजावट करुन रात्री वाजत गाजत गावातून छबिण्याची मिरणुक निघते छबीना मिरवणूकीत लेझीम पथक,ढोल पथक,बँड पथक सहभागी असतात तरुणांचा सहभाग कावडी व छबीना मिरणुकीत मोठ्या प्रमाणात असतो छबिना मिरणुक भैरवनाथ मंदिरा पासून चैतन्यस्वामी मंदिरा समोर येते स्वामींच्या मंदिराजवळ आल्यावर शोभेच्या फटाक्यांची अतिशय सुंदर आतिषबाजी केली जाते.दुसऱ्या दिवशी सकाळी हज-यांचा कार्यक्रम होतो. विविध खाऊची दुकानाने, खेळण्याच्या दुकाने याने परिसर फुलून जातो दुपारी कुस्त्यांचा कार्यक्रम होतो.यानंतर यात्रेची सांगता होती .



# हिंजवडी(पुणे) येथे आ.सुरेश धस यांच्या हस्ते शिवश्री बिर्याणी हाऊसचे उदघाटन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजू म्हस्के

बीड जिल्यातील होतकरू तरुण उद्योजक शहादेव चौधरी यांच्या शिवश्री बिर्याणी हाऊस या दालनाचे दि.२१ एप्रिल रोजी आ.सुरेश धस यांच्या शुभ हस्ते उदघाटन समारंभ पुणे हिंजवडी येथे पार पडला.

शहादेव चौधरी हे मागील पाच वर्षांपासून उद्योगामध्ये आहेत. त्यांचे सद्या शिवश्री मिसळ हाऊस, पिझ्झी,श्री मलई कुल्फी, शिवश्री एंटरप्राइजेस, असे अनेक उद्योगसमूह त्यांचे चालू आहे.त्याच बरोबर शिवश्री बिर्याणी हाऊस हे नवीन दालनाचा भव्य उदघाटन समारंभ नानाश्री फूड प्लाझा लक्ष्मी चौक हिंजवडी पुणे येथे दिनांक २१ एप्रिल दिवशी आ.सुरेश धस यांच्या हस्ते पार पडला.

=या वेळी उपस्थित मान्यवरांनी व्यवसायाला शुभेच्छा दिल्या.यामध्ये उधोजक बंडुसाहेब तोडकर, माजी सरपंच विशाल साखरे,भाजपा युवा मोर्चा प्रदेश कार्यकारिणी तथा गोपिनाथ मुंडे ऊसतोड कामगार संघटना राज्य प्रवक्ते अभिजित शेंडगे,विक्रम साखरे, प्रतिक साखरे,संदीप साखरे,उद्योजक संतोष ढवळे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष संजय आजबे,रायबा बुचडे, युवक सरचिटणीस समिर शेठ बुचडे,संतोष साखरे , अमोलशेठ साखरे, किरण शेठ साखरे,युवा उधोजक अमोल बोरूडे,अमर सुनिल आजबे, रामभाऊ क्षीरसागर, उध्दव झोडगे , रामदास नाईकवाडे , सागर नखाते, संभाजी चोरघडे, रमेश मस्के, बंडु चव्हाण, भाऊसाहेब चौधरी, अंगद निगमे (रेड्डी),ज्ञानेश्वर चौधरी ,अमोल मुरूमकर गणेश आंबेगावकर, बंडू सुरवसे, डॉ.ऋषिकेश आजबे, अशोक करडुळे ,लाला भवर,आकाश सुरवसे, डॉ.ऋषिकेश चौधरी, भागवत झांबरे,हरी सुरवसे आदींसह पदाधिकारी,मित्र परिवार, नातेवाईक मोठया संख्येने उपस्थित होते.



# चिंचाळा येथे विठ्ठल-रखुमाई संत यादवबाबा यांच्या मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

आष्टी तालुक्यातील श्री. क्षेत्र बाबासाहेबगड येथे श्री.विठ्ठल-रखुमाई व वै.संत यादवबाबा यांची मुर्ती प्राणप्रतिष्ठा कार्यक्रम संपन्न झाला त्यांच्यानिमित्त मुर्ती मिरवणुक शनिवारी सकाळी झाली..लमणवस्ती,चिंचाळा येथुन श्री.क्षेत्र बाबासाहेब गड,चिंचाळा येथे मिरवणुक झाली.या काळात काकडा,हरिपाठ,हरिभजन व नंतर हरिजागर झाला. शांतीपाठ, गणपती पुजन,पुण्यवाचन, मातृकापुजन,आझीस्थापन, हवन,मुर्तीवर संस्कार करण्यात आले.सोमवार दि.१५ एप्रिल रोजी सकाळी ८ ते १० मुर्तीप्राणप्रतिष्ठा ह.भ.प. शास्त्री महाराज, ह.भ.प.नवनाथ महाराज पोकळे, ह.भ.प.कल्याण महाराज कोल्हे, ह.भ.प.आसाराम महाराज,ह.भ.प. नागनाथ महाराज, ह.भ.प.पांडुरंग महाराज कुंभार यांच्या उपस्थितीत झाले. काल्याचे किर्तन ह.भ.प. गोविंद महाराज शिंदे (डाकुनिमगांव) यांचे काल्याचे किर्तन झाले. यावेळी गांवकरी मंडळी, देसुर,चिंचाळा,शेकापुर, बेलगांव,राघापुर येथील भाविक व ग्रामस्थ मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

# वादळीवाऱ्यासह पावसामुळे ताकडगाव शिवारातील गुळ पावडर कारखान्याचे नुकसान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत

तालुक्यात बुधवार दि.१७ रोजी रात्री झालेल्या वादळीवाऱ्यासह पावसामुळे बळीराजा पुड्रोसर कंपनी चा ताकडगाव शिवारातील गुळ पावडर कारखानाचा काही भाग हा जमिन दोस्त झाला असून या वादळीवाऱ्यामध्ये या कारखान्याचे पत्रे उडून जवळपास २ कोटी चे नुकसान झाले आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की, बुधवार दि.१७ रोजी रात्री सातच्या सुमारास वादळीवाऱ्यासह जोरदार अवकाळी पावसाची सुरुवात झाली होती. या वादळी वाऱ्यामुळे अनेक कांच्या घरावरील पत्रे उडाली होती. या झालेल्या अवकाळी पाऊस व वादळीवाऱ्यामुळे तालुक्यातील शेतकरी व नागरिकांची चांगलीच धावपळ उडाली याच वादळी वाऱ्यात तालुक्यातील ताकडगाव शिवारात असलेल्या बळीराजा पुड्रोसर कंपनी चा गुळ पावडर कारखाना काही भाग हा जमिन दोस्त झाला. तर काही ठिकाणचे पत्रे उडून अस्ताव्यस्त पडले होते. गुरुवार रोजी कारखान्याचे चेअरमन कारखान्यात सकाळी आले असता त्यांना आपला गुळ पावडर कारखाना हा या वादळी वाऱ्यामुळे जमिन दोस्त झाला असल्याचे निदर्शनास आले. त्यांनी तात्काळ घटनेची माहिती तहसीलदार संदीप खोमणे यांनी घटनास्थळी येऊन मंडळ अधिकारी जितेंद्र लेंडाळ यांच्या समवेत प्रशासनाच्या वतीने पंचनामा केला. या घटनेत या गुळ पावडर कारखान्याचे जवळपास २ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे.



# ८५ वर्षा वरील ज्येष्ठ व दिव्यांग मतदारांचे ‘वोट फ्रॉम होम’ अंतर्गत आज पासून मतदान

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

संसदीय निवडणुकांसाठी, भारत निवडणूक आयोगाने ८५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या आणि ४० टक्क्यांपेक्षा जास्त अपंग असलेल्या मतदारांना घरून मतदान करण्याची संधी दिली आहे. यंदा प्रथमच ज्येष्ठ आणि दिव्यांग मतदारांना घरबसल्या मतदान करण्याची सुविधा दिली जाणार आहे. ज्या व्यक्तींचे वय ८५ वर्षे आणि त्यापेक्षा जास्त आहे आणि जे दिव्यांग आहेत, त्यांच्या घरी जाऊन मतदान घेण्यात येईल. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी निवडणूक आयोगाचा फॉर्म १२ डी भरून जमा केला आहे. त्यानंतर मतदानाच्या दिवशी अधिकारी स्वतः मतदारांच्या घरी येतील आणि बॅलेट पेपरवर मत घेतील. ही सुविधा फक्त मतदान केंद्रांवर येऊ न शकणाऱ्या मतदारांसाठी असणार आहे.

मा. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी ०५ बुलढाणा लोकसभा मतदारसंघातर्गत २४ सिंदखेडराजा विधानसभा मतदार संघातील ८५ वर्ष व त्यापेक्षा अधिक वयाचे मतदार आणि दिव्यांग मतदारांचे मतदान त्यांचे निवासस्थानी जाऊन घेण्यात येत आहे.

मा. सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली नियंत्रण अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि सूक्ष्म निरीक्षक यांचे एक पथक तयार करण्यात आले असून त्यांना दिनांक १७ एप्रिल २०२४ रोजी प्रशिक्षण देण्यात आले आहे. हे पथक दिनांक २१, २२, २३ एप्रिल २०२४ रोजी प्रत्यक्ष मतदारांच्या घरी जाऊन मतदान प्रक्रिया पूर्ण करून घेत आहेत.



सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघांमध्ये एकूण ८५ वर्ष आणि त्यापेक्षा अधिक मतदारांची संख्या ५३९ आहे. यामध्ये पुरुष मतदारांची संख्या २०१ असून महिला मतदारांची संख्या ३३८ आहे. तसेच दिव्यांग (झथऊ) मतदारांची एकूण संख्या ८९ आहे, यामध्ये पुरुष मतदारांची संख्या ६२ असून महिला मतदारांची संख्या २७ आहे. दिव्यांग मतदार आणि ८५ वर्ष आणि त्यापेक्षा अधिक मतदारांची एकूण संख्या ६२८ एवढी आहे.

या ६२८ मतदारांचे मतदान दिनांक २१, २२ आणि २३ एप्रिल २०२४ रोजी नेमून दिलेल्या पथकातील संबंधित अधिकारी पोलीस कॉन्स्टेबल आणि व्हिडिओ ग्राफर यांना सोबत घेऊन (दि.२१) पासून मतदारांच्या निवासस्थानी जाऊन मतदान करून घेत आहेत.

मा. सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा.संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली 'वोट फ्रॉम होम ' अंतर्गत सुरुवात झाली त्याप्रसंगी मा. तहसीलदार सिंदखेड राजा श्री. प्रवीण धानोरकर, मा. मुख्याधिकारी देऊळगाव राजा श्री. अरुण मोकळ, मतदान पथकाचे अधिकारी श्री. आर. पी. ठाकरे, श्री. समाधान वाघ,श्री. बी. वाय. म्हस्के, श्री. बी. जे. हंदाळ, श्री. गौरव शेलकर, मा. उपअधीक्षक भूमि अभिलेख देऊळगाव राजा श्री. विजय माईनकर तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते. प्रसार आणी प्रचार माध्यम सेल मध्ये अंकुश म्हस्के, उमेश गरकळ, प्रकाश शिंदे, संजय सोनुने, राजेंद्र खरात हे काम करत आहेत.

# अपघातातील त्या जखमी तरुणाचा उपाचारा दरम्यान मृत्यू

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । शेख जफर**

भोकरदन येथील मावस भावाकडील नानमुखाचा कार्यक्रम आटोपून दुचाकीने घराकडे परत येणाऱ्या एका तरुणाला भायडी गावा नजीक अज्ञात वाहनाने जोराची धडक दिली.सदर घटनेत जख्मी झालेल्या तरुणाला पुढील उपचारासाठी संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात दाखल केले मात्र उपचारा दरम्यान त्या जख्मी तरुणाचा मृत्यू झाला असल्याची घटना शनिवारी रात्री घडली आहे.अपघातात मृत पावलेल्या तरुणाचे नाव शंकर बन्सी परणकर(४५) असे असुन तो भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाई येथील रहिवासी आहे. सध्या सर्वत्र लग्नाची धामधूम आहे.त्यामुळे आपल्या मावस भावाकडे शंकर हा नानमुखाच्या कार्यक्रमासाठी शनिवारी सकाळीच भोकरदनला आला होती.रात्री उशीरापर्यंत कार्यक्रमात राहुन तो सात वाजेच्या दरम्यान घराकडे निघाला.मात्र भायडी गावाजवळ समोरून जोरात येणाऱ्या अज्ञात वाहनाने जोराची धडक दिल्याने शंकर हा गंभीर जख्मी झाला.प्रत्यक्षदर्शींनी गावात नातेवाईकाला फोन केल्यावर नातेवाईकांनी त्याला



प्रथम भोकरदन येथील ग्रामीण रुग्णालायात नेले.मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने येथील डाँक्टरानी त्याला जालना येथे हलविण्याचे सांगितले.मात्र तेथुन पुन्हा शंकरला संभाजीनगरला घेऊन जाण्याचा सल्ला डाँक्टरानी दिला.त्याला संभाजीनगर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करुन त्याच्यावर उपचार सुरू करण्यात आले.मात्र उपचारा दरम्यान शंकरचा मृत्यू झाला.सदर घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत आहे.त्याच्या पाश्चात आईवडील,पत्नी,भाऊ,दोन मुल,एक मुलगी असा परिवार आहे.रविवारी त्याच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंतिम संस्कार करण्यात आले.

# अर्धवट कामे पूर्ण करा ;प्रहार जनशक्ती पक्ष तर्फे अजय टप यानी न.प.मलकापूरला दीले निवेदन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी । मलकापूर**

चाळीसबिघा परिसरातील डॉ.मनोज पाटील ते कोलते हॉस्पीटल पर्यंत नाली व रस्त्याचे काम मंजूर तसेच वर्कऑर्डर होऊनही संबंधित कंत्राटदाराने सदर काम अर्धवट करीत गेल्या काही महिन्यांपासून ते बंद आहे. तेव्हा सदरचे नाली व रस्त्याचे काम येत्या ७ दिवसात सुरू करण्यात यावे अन्यथा अधिकार्यांना चपलांचा हार घालू व तोंडाला काळे फासू असा इशारा प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हा उपप्रमुख अजय टप यांनी आज २३ एप्रिल रोजी एका निवेदनाद्वारे न.प. मुख्याधिकारी यांना दिला आहे.



दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, शहरातील चाळीसबिघा परिसरामध्ये डॉ.मनोज पाटील ते कोलते हॉस्पीटलपर्यंत डांबरीकरणाच्या कामाचे कार्यारंभ आदेश १७/५/२०२३ रोजी संबंधित कंत्राटदारास न.प. प्रशासनाच्या वतीने देण्यात आले होते. त्यानंतर संबंधित कंत्राटदाराने या कामामधील नालीचे काम सुरू केले व तेही अर्धवट करून काम गुंडाळण्यात आले. त्याचबरोबर या कामाच्या कार्यारंभ आदेशावेळी डांबरीकरणाच्या रस्त्याचाही कंत्राट संबंधित कंत्राटदारास देण्यात आलेला होता. परंतु या कार्यारंभ आदेशाप्रमाणे ना नालीचे काम पुर्ण करण्यात आले तर रस्त्याचे काम तर करण्यातच आले नाही. एकीकडे शासन नागरी मुलभूत सुविधांकरीता लाखो रूपयांचा निधी देते. परंतु हा निधीचा विनियोग योग्य पध्दतीने होत नसल्याने एकप्रकारे शासनाच्या लाखो, करोडो रूपयांना एकप्रकारे चुना लावण्याचे कामच केले जात आहे. तेव्हा अशा कंत्राटदाराची योग्य ती चौकशी करण्यात यावी तसेच अशा कंत्राटदारांना पाठीशी घालणार्या अधिकार्यांचीही चौकशी व्हावी. तर येत्या ७ दिवसात सदरचे कामाला सुरूवात करण्यात न आल्यास नाईलाजास्तव आम्हाला संबंधित अधिकार्यांना चपलांचा हार घालण्या बरोबरच त्यांच्या तोंडाला काळे फासावे लागेल, असा इशारा देण्यात आला आहे.निवेदन देतेवेळी प्रहार जनशक्ती पक्ष उपजिल्हा प्रमुख अजय टप, तालुका प्रमुख अजित फुंदे,शहर उपप्रमुख बळीराम बावस्कार, शिक्षक आघाडीचे संजय पाटील सर व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# पंचनामा झाला मात्र अद्यापही गुलदस्त्यांत त्या टिपरवर कारवाईच नाही

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

तालुक्यातील मलकापूर पांग्रा येथे तहसीलदारांनी पकडलेले टिप्पर कारवाई विनाच आहे. दरम्यान तलाठ्यांनी या संदर्भात पंचनामा करून तहसीलदाराकडे अहवाल दिला आहे. मात्र अजूनही है पंचनामा गुलदस्त्यांतच असून टिप्पर वर अद्याप पर्यंत कारवाई का केली नाही? असा प्रश्न उपस्थित होत आहे.



याबाबत माहिती अशी की नव्यानेच रुजू झालेले तहसीलदार प्रवीण धानोरकर यांनी मलकापूर पांग्रा येथे अवैध रेती वाहतूक करताना पांढऱ्या रंगाचे चार ब्रास चे टिप्पर पकडले होते. त्यानंतर तहसिलदारांनी तलाठ्यांना माहिती दिली, तलाठ्याने पंचनामा करून अवहाल तहसीलदाराकडे सादर केला असला, तरीही यासंदर्भात आठ दिवसाचा कालावधी लोटला तरी अद्याप देखील त्या टिप्पर वर कारवाई केली नसल्याने पाणी कुठे मुरते या संदर्भात प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. त्या टिपरवर अध्याप पर्यंत कारवाई कशामुळे झाली नाही, कारवाई थांबली तर रेती माफिया चे मनसुबे आणखी वाढतील. असा प्रश्न तालुक्यांतील नागरिकांना पडत आहे या संदर्भात जिल्हाधिकारींनी लक्ष घालून तात्काळ या टिप्पर वर गुन्हा दाखल करावे अशी मागणी जनतेतून होत असून नेमका आठ दिवसाच्या या कालावधीमध्ये कोणाच्या वरदहस्तामुळे हे प्रकरण दाबण्याचे काम हे अधिकारी करीत असल्याचा ही प्रश्न निर्माण होत आहे.


# प्रा.नरेंद्र खेडेकर मोठ्या मताधिक्याने जिंकणार हा सर्वसामान्यांचा विश्वास – सुनिल महाराज

लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । प्रतिनिधी**

लोणार प्राध्यापक नरेंद्र खेडेकर मोठ्या मताधिक्याने जिंकणार हा विश्वास सर्वसामान्य मतदार राजांच्या डोळ्यात दिसत आहे असे वक्तव्य सेवालाल महाराज यांचे वंशजपोहरादेवी संस्थांचे सुनील महाराज यांनी केले

लोणार शहरांमधील बंजारा तांडा येथे सेवालाल महाराजांची वंशज व पोहरादेवी संस्थांचे सुनील महाराज यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी बोलताना ते पुढे म्हणाले वहाविकास आघाडीचे उमेदवार प्रा. नरेंद्र खेडेकर हे तर शंभर टक्के निवडून येणारच परंतु त्यांना प्रचंड मताधिक्याने निवडून आनायचे आहे व बंजारा समाज एक वचनी,



स्वाभिमानी व विश्वासू समाज आहे बंजारा समाज हा एक गठ्ठा मतदान आपल्या आवडत्या उमेदवाराला करतो व ते संपूर्ण मतदान महाविकास आघाडीचे उमेदवार प्राध्यापक नरेंद्र खेडेकर यांना करण्याचे आवाहन सुनील महाराजांनी केले.

याप्रसंगी बुलढाणा लोकसभा समन्वयक राहुलजी चव्हाण प्रा. डॉ. गोपाल बशिरे श्री गजानन जाधव श्री सुदन अंभोरे यांचीही भाषणे झाली या सभेस प्रामुख्याने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, आम आदमी पक्ष, यांचे पदाधिकारी ड. दीपक मापारी, भरत राठोड, पुंजाराम जाधव, सतीश राठोड, परमेश्वर दहातोंडे, श्रीकांत नागरे, राजू बुधवत, आश्रुवा धारकर, लुकमान कुरेशी, ऊमर सय्यद, इकबाल कुरेशी, जीवन घायाळ, श्रीकांत मादनकर, अमोल सुटे, गणेश सोलंकी, विशाल चव्हाण, अजय सुरुशे, सतीश साठे, गणेश पाठे, यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारत राठोड यांनी केले तर आभार सतीश राठोड यांनी मानले.



**नांदेड शहर जिल्हा युवक काँग्रेस नूतन जिल्हाध्यक्ष शंकर पाटील शिंदे हे लोहा येथे आले असताना त्यांचा सत्कार करताना लोहा नगरपालिकेचे मा.नगरसेवक युवराज वाघमारे दशरथ गुंठे व सहकारी मित्र(छाया लोकनेता न्यूज नेटवर्क लोहा)**

# मा.उद्धव ठाकरे यांना लोणार सरोवराची प्रतिमा देऊन सत्कार



लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । प्रतिनिधी**

लोणार महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मा.उद्धव ठाकरे साहेब यांचे स्वागत लोणार तालुक्याच्या वतीने प्रा.डॉ.गोपाल बशिरे यांनी लोणार सरोवराची प्रतिमा देऊन केले.

खामगाव येथील जाहीर सभेसाठी माननीय उद्धव साहेब ठाकरे आले होते ठाकरे साहेब महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आहेत ज्यांनी लोणार सरोवरला भेट देऊन सरोवराच्या विकासासाठी निधी दिला होता, या सभेच्या प्रसंगी मेहकर विधानसभा क्षेत्राच्या वतीने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बशिरे व बुलढाणा जिल्हा सहसंपर्कप्रमुख छगनदादा मेहत्रे यांनी लोणार सरोवराची प्रतिमा भेट देऊन त्यांचे स्वागत केले.

# वालसावंगी येथे मतदान जनजागृती मोहीम संपन्न



लोकनेता न्यूज नेटवर्क

**वालसावंगी । कौतिक हिवाळे**

१८ जालना लोकसभा मतदारसंघ सार्वत्रिक निवडणूक २०२४ १०३ भोकरदन विधानसभा मतदारसंघ मी मतदान करणारच ! यानिमित्त वालसावंगी गावातील स्वीप अंतर्गत मतदार जनजागृती स्वाक्षरी मोहीम येथील विठ्ठल मंदिर येथे आज मान्यवरांच्या व ग्रामस्थांच्या उपस्थित राबविण्यात आली. याप्रसंगी भोकरदन तालुक्याचे गटविकास अधिकारी विष्णु बोडखे,विस्ताराधिकारी पाडुरंग सोनवणे,ग्रामविकास अधिकारी सुनील पडोळ साहेब मार्गदर्शक केंद्रप्रमुख श्री.सोळंके,केंद्रप्रमुख श्री.बिराडे, मुख्याध्यापक श्री.भोंबे,श्री.गवळी,श्री. खिल्लारे, योगेश भारती,राजू कोथलकर,श्री.गायकवाड,श्री.शेवाळे,मोसीन सर,हिरालाल कोथलकर,संजय कोथलकर, सर्व अंगणवाडी ताई आशा सेविका तसेच गावातील सर्व मंडळी व महिला मंडळ उपस्थित होते.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४
This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904